साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

• रिसोड जि.वाशीम • वर्ष १८ • अंक १९ • मंगळवार, दि. ३० सप्टेंबर ते ७ ऑक्टोंबर २०२५ • पृष्ठे ४ • किंमत १ रू.

■ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर ■ शौर्य दिन उत्साहात साजरा

## सैनिकांचा त्याग समाजासाठी आदर्शवत









**वाशिम, दि. २९ सप्टेंबर (जिमाका) देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांमुळे देश सुरक्षित व सक्षमपणे वाटचाल करत आहे. जिल्हा प्रशासन माजी सैनिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी कटीबद्ध आहे आणि त्यांची सेवा, त्याग सदैव स्मरणात ठेवली जाईल. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विश्वनाथ घुगे, कल्याण संघटक संजय यलमर उपस्थित होते.**




जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शौर्य दिनाच्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री . कुंभेजकर बोलत होते. जिल्हा सैनिक कार्यालयाच्या वतीने, दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय सैन्य दलाने दि. २९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकिस्तान हद्दीत शिरून सर्जिकल स्ट्राईकद्वारे अतिरेक्यांचा खात्मा केला होता. भारतीय सैन्याची अभिमानास्पद कामगिरी जनतेपर्यंत व्यापक प्रमाणात पोहचविण्यासाठी दरवर्षी शौर्यदिन साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने माजी सैनिक, शहिद जवानांच्या विरपत्नी, विरमाता, वीरपिता आणि शौर्य पदकधारकांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी कोमल नवघरे यांना सदनिका खरेदी करीता दीड लक्ष रुपयांचा धनादेश जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. श्री.कुंभेजकर यांनी शहिदांच्या स्मृतीचिन्हास पुष्पहार अर्पण केला व शहिदांना सामुहिक अभिवादन करण्यात आले.

यावेळी भारत पाकिस्तान युध्दात १२ सप्टेंबर १९६५ रोजी शहिद झालेले शिपाई यशवंत सरकटे यांच्या विरपत्नी शांताबाई सरकटे व जम्मु कश्मिरमध्ये आतंकवादयाविरुद्धच्या ऑपरेशन मोहिमेत ११ डिसेंबर १९९४ रोजी आर्टिलरी रेजीमेंटचे शहिद झालेले शिपाई दगडु लहाने यांच्या विरपत्नी श्रीमती पार्वतीबाई लहाने , श्रीमती वैशाली अमोल गोरे, वीरपत्नी मिराबाई भोगराज नागुलकर यांचा शाल व श्रीफळ देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपीक शिवशंकर झाडोकार, कल्याण संघटक संजय यलमर, लिपिक माणिक इंगळे व विष्णू घुगे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारीवृंद,माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, माजी सैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## भारत माध्यमिक शाळा, रिसोड येथे युवा संवाद कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ विद्यार्थ्यांना शालेय व भविष्यातील कागदपत्रांच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती ■ तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचे मार्गदर्शन

**रिसोड : भारत माध्यमिक शाळा, रिसोड येथे युवा संवाद कार्यक्रम नुकताच पार पडला, ज्यात विद्यार्थ्यांना शालेय जीवनात तसेच भविष्यातील आवश्यक कागदपत्रांविषयी सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर उपस्थित होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल धांडे, ग्राम महसूल अधिकारी किशोर अवचार आणि मुख्याध्यापक श्री. भांडेकर उपस्थित होते.**





कार्यक्रमात विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, डोमिसाईल, नॉन-क्रिमिलिअर यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांचे उद्देश, अर्ज प्रक्रिया आणि त्यांचा व्यवहारात उपयोग याबाबत मार्गदर्शन देण्यात आले. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर आणि ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल धांडे यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपले प्रश्न विचारले आणि मार्गदर्शन घेतले. शिक्षक वर्गाने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले, तर शालेय प्रशासनाने या कार्यक्रमाला उच्च प्रतीचे मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. भांडेकर यांनी केले, तर सूत्रसंचालन धनंजय देशमुख यांनी केले.

यावेळी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी सर्वांना आवाहन केले की, महसूल विभागाच्या सेवांसाठी आपले सरकार सेवा केंद्र वगळता कुठेही शुल्क देऊ नये आणि कोणत्याही मध्यस्थीच्या मदतीशिवाय सर्व कागदपत्रे स्वतः येऊन काढावीत. शेवटी, आदर्श आपले सरकार सेवा केंद्र, तहसील कार्यालय रिसोड च्या वतीने केंद्र चालक रुपेश बाजड यांनी विद्यार्थ्यांना दाखल्यांसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे याबाबत परिपत्रक वाटून दिले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना माहिती मिळाली व त्यांच्या शासकीय व्यवहारांना मार्गदर्शन मिळाले.

# तात्कालिक दुखणं

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे महाराष्ट्रातील प्रदेश आणि संख्या यात गेल्या अनेक वर्षांत फारसा फरक पडला नसला, तरी त्याची कारणं मात्र वेगवेगळी आहेत. अनेक वेळा तर ती परस्परविरोधी पाहायला मिळतात. त्यामुळे, या दुखण्याला एकच एक उपाय नाही. पण, सर्व आत्महत्यांची कारणं पाहून त्यावर उपाययोजना करण्यासाठी व्यापक आराखडा तयार केला आणि त्यातील उपायांची प्रदेशनिहाय प्राधान्याने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित त्याचे सकारात्मक परिणाम मिळतीलही. सरकारने वेळोवेळी अनेक उपाययोजना लागू केल्या. त्याची यशस्वी अंमलबजावणी झाल्याचे अहवाल सरकारदप्तरी जमा आहेत. तरीही आत्महत्या थांबत नसतील, तर औषधातच काहीतरी गडबड आहे, त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही हे सरकारने स्वीकारण्याची गरज आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या परीने या प्रश्नाला भिडायचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्याने; घरातल्या कर्त्या पुरुषाने आत्महत्या केल्यानंतर मागे राहिलेल्या त्याच्या पत्नीला, मुलाबाळांना धीर देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाय करण्याचा प्रयत्न या संस्थांकडून सुरू आहे. त्याला यशही येत आहे. पण, स्वयंसेवी संस्थांचे हे प्रयत्न एकूण गरज पाहता तोकडे पडताहेत. दुर्घटना घडल्यानंतर उर्वरित कुटुंबीयांची काळजी घेण्याची गरज असतेच; पण त्याहीपेक्षा दुर्घटना घडणारच नाही यासाठी दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे. अशी उपाययोजना केवळ सरकारच करू शकते. केंद्र आणि राज्यातील सरकारांनी केवळ या एकाच प्रश्नासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करून, त्यात तज्ज्ञांचा समावेश करून महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखायला हवा. शेतकऱ्याला दोरीच्या फासापर्यंत जावंच लागणार नाही, अशी परिस्थिती निर्माण व्हायला हवी. खरंतर, हे सगळ्यांनाच मान्य आहे. याबाबत कोणाचंच दुमत नाही. पण, तरीही जे प्रयत्न व्हायला हवेत, ते होताना दिसत नाहीत. उलट, या आत्महत्यांबद्दल संशय निर्माण करणाऱ्या कथा चर्चिल्या जातात हे दुर्दैव आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, शेतमालाला रास्त भाव न मिळणं, शेतमालाचा बहुतांश असंघटित बाजार - यानंतर आता वातावरणीय बदलाचाही समावेश या संकटांमध्ये होतो आहे. अन्य सामाजिक, सांस्कृतिक कारणं त्यानंतर आहेतच. यातल्या कोणत्या प्रश्नांना सरकारकडे उत्तर असेल आणि कोणते प्रश्न स्वयंसेवी संस्थांच्या हाती सोपवायचे याचा विचार करून दोन्ही पातळ्यांवर त्यासाठी काम करावं लागेल. महाराष्ट्रात आरक्षणासाठी जसं मराठ्यांचं आंदोलन सुरू आहे, तसंच अन्य राज्यात तिथले धारक; शेतकरी समाजही याच कारणासाठी रस्त्यावर आले आहेत. आपल्या दु:स्थितीला आरक्षण हे उत्तर नाही, हे त्यांनाही माहीत आहे. पण, जखमेवर फुंकर घालणं ही त्यांची गरज आहे. शेतीच्या प्रश्नाकडे प्राधान्याने, गांभीर्याने पाहिल्याखेरीज, मक्तेदारी अर्थव्यवस्थेकडे चाललेली वाटचाल बदलल्याखेरीज फासाला लटकावून घेणाऱ्या बळीराजाला दिलासा मिळणार नाही. शेतीसंबंधी असा मूलभूत विचार केला नाही, तर आत्महत्यांची संख्या आणि त्यातून असंतोष वाढतच जाईल. त्यातला धोका सगळेच जाणतात.

# मालेगांवच्या विघ्नहर्ता गणेश मंडळाला सलग दुसऱ्या वर्षीही जिल्ह्यातुन प्रथम पारितोषिक





**मालेगाव प्रतिनिधी**

राज्य महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते .त्यात यावर्षी सुध्दा मालेगाव येथील विघ्नहर्ता गणेश मंडळाला दुसऱ्यांदा जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळाला असून मंडळाला पन्नास हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले असल्याने मालेगांवकरांनी आनंद व्यक्त केला आहे .

महाराष्ट्र राज्यात साजरा होणारा गणेशोत्सव हा " राज्य महोत्सव " म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री एड. आशिष शेलार यांनी केली होती. महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ स्पर्धासाठी मार्गदर्शक सूचनानुसार गुणांकन करून वर्षभर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गणेश मंडळाला शंभर गुणांच्या आधारे बक्षीस मिळणार होते. त्यानुसार मालेगाव येथील विघ्नहर्ता गणेश मंडळांने समाजोपयोगी अनेक उपक्रम राबविले होते. त्यानुसार मंडळाने वर्षभरात अनेक सामाजिक , सांस्कृतिक , शैक्षणिक , क्रिडा, आरोग्य , कृषी विषयक उपक्रम राबविले होते . त्या उपक्रमांची प्रा .पी एस खिराडे व प्राचार्य वसंतराव अवचार यांच्या मार्गदर्शनात मंडळाच्या समस्यांनी व्यवस्थित व पुराव्या सह फाईल बनविली होती . ती फाईल शासनाच्या निर्देशानुसार राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर गुणांकणासाठी पाठवण्यात आली होती . मात्र राज्यात क्रमांक मिळेल अशी अपेक्षा मंडळाला असतांना राज्य स्तरावर परीक्षण होऊन त्या निकाषामधे मंडळ उतरले नाही . परंतु त्यात वाशिम जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे पन्नास हजार रुपयांचे पारितोषिक त्यांना मिळाले आहे. मागील वर्षी सुध्दा या विघ्नहर्ता गणेश मंडळाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला होता हे विषेश . या वर्षीही विघ्नहर्ता गणेश मंडळाला जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळाल्या बद्दल तालुका मुल्यमापन समितीचे अध्यक्ष निवासी तहसीलदार रंजना गोरे, तसेच ठाणेदार संजय चौधरी , मुख्याधिकारी पंकज सोनुने, सा. बां. उपअभियंता के.एस.जोगदंड, गटविकास अधिकारी कैलास घुगे, सेवानिवृत्त प्रा.पी.एस.खिराडे , सेवानिवृत प्राचार्य वसंतराव अवचार या समिती सदस्यांनी व संपूर्ण मालेगांव शहर व तालुक्यातील गणेशभक्तांनी मंडळाचे अभिनंदन केले आहे.

## दिवाळी निमित्त अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दोन हजार रुपये भाऊबीज भेट

मुंबई, दि. २६ : अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दोन हजार रुपये भाऊबीज म्हणून भेट देणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

एकात्मिक बाल विकास सेवा (खडूड) योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना भाऊबीज भेट म्हणून देण्यात येणार आहे.

यासाठी एकूण ४०.६१ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला व बालकांच्या संगोपनासाठी, पोषणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी महत्वाची सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ही भाऊबीजेची रक्कम भेट स्वरूपात मंजूर केली आहे.

## दररोज सुमारे ३५०० जणांना चावे
## आरोग्य विभागाच्या आकडेवारीतील वास्तव
# राज्यात ३५ लाखांवर मोकाट कुत्रे

**विशेष प्रतिनिधी**

**वर्धा:** राज्यात दररोज सुमारे साडेतीन हजार जणांना मोकाट कुत्री चावा घेत असल्याची आकडेवारी आरोग्य विभागाकडून समोर आली आहे. त्याचवेळी राज्यात किमान ३५ते४० लाख मोकाट कुत्री असल्याचे सांगितले जात असून आरोग्य विभागाच्या वतीने दरवर्षी १० ते १२ लाख नागरिकांवर कुत्र्यांच्या चाव्याबाबत उपचार केला जातो. मागील ३ वर्षांत सुमारे ३० लाख नागरिकांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला चढविल्याची आकडेवारीही समोर येत आहे. राज्यातील प्रमुख शहरातच नव्हे तर गावखेड्यातही मोकाट कुत्री झुंडीने फिरत असल्याचे दिसते. बाजारपेठा, शाळा परिसरात, ही मोकाट कुत्री निर्धास्तपणे वावरत असतात. वृद्धनागरिक, मुलांवरच काय पण सायकलने जात असलेल्या किंवा दुचाकीने जात असलेल्यांचा काही मोकाट कुत्री पाठलाग करून चावा घेण्याचा प्रयत्न करण्याच्या घटना समोर आल्या आहेत. रात्रीच्याच काय पण दिवसाही ही मोकाट कुत्री पाठलाग करून चावा घेण्याचा प्रयत्न करतात. मोकाट कुत्र्यांनी पाठलाग केल्यामुळे दुचाकी चालकांना अपघात झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. मोकाट कुत्र्यांनी चावा घेण्याच्या घटनेत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक आहे. सोलापूर जिल्ह्यातील कुत्र्यांच्या चाव्याचे वास्तव तर धक्कादायक आहे, सोलापूर जिल्ह्यात दररोज सरासरी ५० ते ६० जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याने शासकीय रुग्णालयात उपचार घेण्याची पाळी आली आहे. पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त विशाल येवले यांच्या म्हणण्यानुसार मोकाट कुत्र्यांची शहरी भागात मोठी समस्या आहे. विशिष्ठ काळात ही कुत्री झुंडीने फिरत असतात. त्यातील काही नागरिकांवर हल्लेही करतात. यावर उपाययोजना म्हणून ॲनिमल वेल्फेअर लॉ नुसार मोकाट कुत्र्यांची संख्या कमी केली जात आहे. महापालिका, पालिकेच्या वतीनेही मोकाट कुत्र्यांना पकडण्याबाबत मोहीम राबविली जाते. देशातील भटक्या कुत्र्यांची संख्या जास्त असलेल्या राज्यांची माहिती घेतली असता उत्तर प्रदेशात भटक्या कुत्र्यांची संख्या सरासरी ५३ लाखांच्या आसपास आहे. त्यापाठोपाठ भटक्या कुत्र्यांची संख्या तामिळनाडूत असून तामिळनाडूत सरासरी ४४ लाख भटकी कुत्री तर महाराष्ट्रात ४० लाख भटकी कुत्री तसेच पश्चिम बंगालमध्ये १८ लाख भटकी कुत्री असल्याचे सांगितले जाते.

## रस्त्यावर सोडण्यापूर्वी कुत्र्यांना मास्क घालावा

**कुत्र्यांना आवर घालण्याचा उपाय निश्चितच नाही**

कुत्र्याने चावा घेतल्यास झालेली जखम साबणाने स्वच्छ करावी, दवाखान्यात जाऊन रेबीज प्रतिबंधक लस घ्यावी, असे सुचविले गेले आहे. कुत्री पाळणाऱ्यांनी त्यांची कुत्री रस्त्यावर सोडण्यापूर्वी कुत्र्यांना मास्क घालावा. भटक्या कुत्र्यांना जिवानिशी मारून टाकणे, हा मोकाट कुत्र्यांना आवर घालण्याचा उपाय निश्चितच नाही. त्याकरीता ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिकेला सुचना देऊन मोकाट कुत्र्यांना पकडण्याचा उपाय करता येतो.

## पिके कमरेएवढ्या पाण्यात तरंगतायत
## लोकवस्ती-शाळांना तळ्याचे स्वरूप
# मराठवाड्यात पावसाचे थैमान!

**संभाजीनगर:** मराठवाड्यातील पूर परिस्थिती ओसरण्यास सुरुवात होताच पुन्हा एकदा बीड, धाराशिव, परभणी, नांदेडसह लातूरमध्ये गेल्या २४ तासात पावसाने हाहाकार माजवला आहे. परभणीच्या पूर्णा तालुक्यातील शेतकऱ्यांची पिके कमरेएवढ्या पाण्यापर्यंत आली आहेत.

सोयाबीन कापूस चिंब भिजले असून शेतकरी कर्जमाफी आणि सरसकट मदतीची मागणी करत आहेत. अनेक सखल भागात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून पुरामुळे आधीच भिजलेली पिके चारा मृत जनावरे यांच्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. रात्रभर झालेल्या दमदार पावसामुळे बीडमधील जिल्हा परिषद शाळेला तळ्याचे स्वरूप आले आहे. पुणे परिसरात झालेल्या पावसाने उजनी धरणातून ८० हजार क्युसेक विसर्ग भीमा नदीत होतोय. त्यामुळे चंद्रभागा दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे अजूनही अनेक गावांना पुराचा धोका कायम आहे. प्रशासनाकडून या जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या आठवड्यापासून होणाऱ्या पावसामुळे आधीच पूर परिस्थिती निर्माण झालेल्या धाराशिव आणि बीड जिल्ह्यात काल रात्रीपासून पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात झाली. नदी नाल्यांना पूर आल्याने अनेक गावांचा अंतर्गत संपर्क तुटला होता. धाराशिव जिल्ह्यातील काजळा गावातील नदीच्या पुलावरून पाणी वाहत असून रस्ता वाहतुकीस पूर्ण बंद आहे.

कळंब तालुक्यातील गोविंदपूर खामसवाडी रस्ता बंद झालाय. बेंबळी बोरखेडा तसेच मोहा खामसवाडी रस्ता ही बंद करण्यात आला आहे. या रस्त्यांवरून शेतकरी बांधवांना प्रवास न करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. बीडमधील पावसाचा जोर पुन्हा वाढला असून बहुतांश शाळांना अघोषित सुट्टी देण्यात आली आहे. जिल्हाभरात झालेल्या रात्रीच्या दमदार पावसाचा फटका शाळांनाही बसताना दिसून येतोय. बीडच्या माजलगाव येथील बडेवाडी जिल्हा परिषद शाळेत पावसाचे पाणी साठल्याने शाळेला तळ्याचे स्वरूप आले होते.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, सा्प्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# अतिवृष्टीने हिरावला शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास!

## अतिवृष्टी, सुसाट वाऱ्यामुळे ९० झेंडू पिकाचे नुकसान - शेतकरी हतबल

**रिसोड** - तालुक्यातील शेतकरी यंदा अतिवृष्टीच्या झळा सहन करीत असतानाच आता झेंडू उत्पादक शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. काही महिन्यापासून सुरूअसलेल्या सततच्या पावसामुळे सोयाबीन, तूर, कपाशी, हळद, भाजीपाला यासह सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाने आजवर केवळ घोषणा केल्या असल्या तरी शेतकऱ्यांच्या हातात मदत काहीही आलेली नाही.



विशेषतः अतिवृष्टीमुळे झेंडू फुलांचा शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. साठ दिवसापासून लेकराप्रमाणे जपलेले झेंडू बाजारात तोडणीसाठी तयार होते. परंतु काल झालेल्या सुसाट वारा व अतिवृष्टीमुळे मांडवा परिसरातील तब्बल ९० टक्के झेंडूचे पीक जमीनदोस्त झाले.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, व्यापारी आधी ४५ ते ५० रुपये किलोने झेंडू मागणी करत होते. मात्र आता पाण्यात भिजलेली, जमिनीवर पडलेली व कुजणारी फुले कोणीही घेण्यास तयार राहणार नाहीत. फुलांमध्ये पाणी शिरल्याने ती पूर्णतः खराब होणार असून, शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत झेंडू उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर काळोख उभा ठाकला आहे. सणासुदीला मिळणारा हमखास उत्पन्नाचा आधारसुद्धा हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांची आर्थिक संकटात आणखी भर पडली आहे. शेतकरी शासनाकडे मागणी करत आहेत की, त्वरित पंचनामे करून नुकसानग्रस्त झेंडू उत्पादक शेतकऱ्यांनातातडीची आर्थिक मदत जाहीर करावी. अन्यथा शेतकरी वर्ग आणखी खोलवर कर्जाच्या गर्तेत जाणार असल्याचा गंभीर इशारा त्यांनी दिला आहे. झेंडूची तोडणी हुकली, शेतकऱ्यांचा आधार हिरावला, आणि शासन केवळ घोषणांवरच थांबले आहे, अशी तिखट प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

### पंडित दीनदयाल उपाध्याय यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



वाशिम, (जिमाका) कुशल संघटक व थोर विचारवंत पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात महसूल उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## गोभणी येथील अतिक्रमण धारक नियमाकूल करा



रिसोड : गोभणी येथील ग्रामपंचायत अंतर्गत सन २०११ पूर्वीच्या निवासी कुटुंबांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी पुराव्यानिशी ११२ प्रस्ताव पंचायत समिती रिसोड येथे सादर करण्यात आले. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर 'सेवा पंधरवडा' या शासकीय कार्यक्रम नुसार पंचायत समिती , तहसील कार्यालय व पुढील कारवाईस जिल्हाधिकारी कार्यालय येथे हे प्रस्ताव जाण्यास विलंब होत आहे. या कामास गती मिळावी,व जागा नियमानकुल व्हावी. म्हणूनच जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री योगेश कुंबेजकर साहेबांना निवेदन देण्यात आले. यावेळी माननीय माजी मंत्री अनंतराव देशमुख, गोभणी जिल्हा परिषद सदस्य अमोल भुतेकर, ग्रामपंचायत उपसरपंच अशोकराव देशमुख, शेख नईम, शेख मजर, शेख मोईन, विजय राऊत ,शेख वाहप, मिल्ट्री पवार, शुभम साबळे, ब्रह्मदेव साबळे, किशोर टाटर ,दीपक घायाळ, सतीश काकडे, पंकज माळोदे, सुनील साबळे, रामचंद्र धारकर, रामा काळदाते, गजानन पवार, सतीश काळदाते, आदी ग्रामस्थ उपस्थित होते..ग्रा.प्र.

## श्री गजानन महाराज संस्थानकडून पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात

### मुख्यमंत्री सहायता निधीस एक कोटी ११ लाखांचा सहयोग निधी सुपूर्द

शेगाव, ता.२८ : यावर्षी महाराष्ट्रात सर्वत्र पावसाने थैमान घातले असून अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊन जनजीवनही विस्कळीत झाले आहे. दरम्यान विदर्भ पंढरी संतनगरी शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानने सामाजिक बांधिलकी जपत पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात दिला असून केवळ घोषणा न करता कृती करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रुपये एक कोटी ११ लाखांचा सहयोग निधी सुपूर्द केला आहे.

संपूर्ण राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी व बचाव कार्यासाठी सरकार शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले आहे. शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याचे आश्वासन सरकारकडून दिले जात आहे. दरम्यान अतिवृष्टीग्रस्त पूरपिडीतांसाठी



शासनाकडून सामाजिक व धार्मिक संस्थांना मदतीचे आवाहन करण्यात आले होते.

त्यास अनुसरून राज्यातील पुरामुळे बाधित झालेल्या पूरपीडितांसाठी 'सर्वे भवन्तु सुखिनः' या ब्रीदाप्रमाणे श्री भक्तांना दैवत मानून सदैव अध्यात्मिक, सामाजिक तसेच शैक्षणिक कार्य करत सामाजिक बांधिलकी जपण्यामध्ये अग्रेसर असलेल्या विदर्भाची पंढरी संतनगरी शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थान या न्यासाचेवतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रुपये एक कोटी ११ लाखांचा सहयोग निधी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना २७ सप्टेंबर रोजी धनादेशाद्वारे सुपूर्द करण्यात आला आहे. श्री संस्थेने भरीव मदत देऊन सेवाकार्या सोबतच सामाजिक बांधीलकी जोपासली आहे.

#### स्वच्छता, शिस्त आणि शांततेचा अनुभव

■ श्री संत गजानन महाराज संस्थान हे केवळ धार्मिक कार्यापुरते मर्यादित नसून, सेवाभावी व समाजोपयोगी उपक्रमात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. संस्थानचे अन्नछत्र, शिक्षणक्षेत्रातील योगदान, आरोग्यसेवा, जलपुरवठा योजना आणि आपत्ती व्यवस्थापनातील सहकार्य या सर्व कार्याचा देशभरातून गौरव होत आहे. यापूर्वीही दुष्काळ व पूरस्थितीत संस्थानने शासनाला भरीव मदत दिली होती. विशेष म्हणजे, स्वच्छतेच्या बाबतीत श्री संत गजानन महाराज संस्थान देशात नंबर एक मानले जाते. येथे येणारा भाविक स्वच्छता, शिस्त आणि शांततेचा अनुभव घेतो. त्यामुळेच संत नगरी शेगाव ही केवळ आध्यात्मिक नाही तर स्वच्छतेचीही राजधानी मानली जाते.

#### सेवा हाच धर्म

■ श्री गजानन महाराजांचा संदेश हा भक्ती, सेवा आणि समर्पणाचा आहे. त्याच धर्तीवर संस्थानने संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जात 'सेवा हाच धर्म' हा बोध प्रत्यक्ष कृतीत उतरवला आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या राज्य ग्रंथालय परिषदेवर - ग्रंथ मित्र प्रभाकरराव घुगे



वाशिम: वाशिम जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह तथा अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथ मित्र: प्रभाकरराव घुगे यांची महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय नुसार राज्य ग्रंथालय परिषदेवर निवड केली असुन त्यांच्या निवडी मुळे अमरावती विभागातील वाशिम ,अकोला, बुलढाणा ,अमरावती ,यवतमाळ या पाचही जिल्ह्यामध्ये ग्रंथालय क्षेत्रामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे ,ग्रंथमित्र प्रभाकरराव घुगे यांचे ग्रंथालय क्षेत्रात फार मोठे योगदान असून असून ग्रंथालय चळवळी करिता संपूर्ण जीवन वाहून घेतलेले असून गेल्या 35 वर्षापासून ते ग्रंथालय क्षेत्रात जोमाने कार्य करीत आहेत, प्रभाकरराव घुगे ग्रंथालय क्षेत्रात उच्चविद्या विभूषित असून

वक्तृत्व ,कर्तृत्व नेतृत्व ,असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असून ग्रंथालय क्षेत्रात अभ्यासू व्यक्तिमत्व,म्हणून त्यांचे कडे बघितले जाते त्यांनी वाशिम जिल्ह्यामध्ये जिल्हा ग्रंथालय संघाची स्थापना करून ग्रंथालय चळवळीची सुरुवात केली आहे वाशिम जिल्ह्यामध्ये गाव तिथे ग्रंथालय ही चळवळ राबऊन जिल्ह्यामध्ये ग्रंथालयाच्या संख्येत वाढ करण्या मध्येत्यांचा सिंहाचा वाटा आहे वाशिम जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना शासन मान्यता मिळण्याकरता विशेष प्रयत्न करने , कार्यरत ग्रंथालयांचा दर्जा वाढ करने, बाबत शासनाकडे पाठपुरावा करणे ,ग्रंथालयांना साधनसामुग्री मिळणे बाबत शासन दरबारी पाठपुरावा करणे,जिल्ह्यतील त्याच प्रमाणे नजीकच्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरीता , सुशिक्षित बेरोजगार, सार्वजनिक ग्रंथालयाचे कर्मचारी ,शालेय व महाविद्यालयीन, आणि खाजगी आस्थापनेवर काम करणारे व इतर कर्मचाऱ्यांकरिता वाशिम या जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रंथपालन प्रशिक्षण सुरू करने, राज्यातील ग्रंथ पालन प्रशिक्षण मधे काळानुरूप सुधारणा करून नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यामध्ये त्यांचा विशेष पुढाकार आहे , जिल्ह्यातील व विभागातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास होण्यासाठी विविध प्रकारच्या योजना बाबत मार्गदर्शन होण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे , सार्वजनिक ग्रंथालयाचे सेवेमध्ये सुधारणा होण्यासाठी विविध प्रकारचे शिबिरे, मेळावे आयोजित करने , स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, ग्रामीण व शहरी भागातील जनतेचा बौद्धिक विकास व्हावा याकरिता वाचन संस्कृतीच्या माध्यमातून गाव तिथे ग्रंथालय ही चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात राबवीत आहेत त्याच प्रमाणे ग्रंथालयाच्या अनुदानाचा वेळोवेळी वाढ करणे, ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व सेवा शर्ती लागू करणे इत्यादी सह सार्वजनिक ग्रंथालयाच्या मागण्याकरिता नागपूर आणि मुंबई येथे मोर्च्याचेआयोजन करणे, जिल्हाधिकारी कार्यालय समोर धरणे आंदोलन आयोजित करणे इत्यादी माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याकरिता वेळोवेळी निवेदनाच्या माध्यमातून पाठपुरावा करणे अशा त्यांच्या व्यापक, कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांची राज्य ग्रंथालय परिषदेवर निवड केली आहे त्यांच्या निवडीमुळे अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये व ग्रंथालय सेवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून राज्य ग्रंथालय परिषदेच्या माध्यमातून राज्यातील ग्रंथालयांचे अनेक वर्ष पासून प्रलंबित असलेले प्रश्न शासन दरबारी मांडून ग्रंथालय चळवळीला नवी दिशा देण्याचे त्यांचे प्रयत्न असून ग्रंथालय चालकांच्या असलेल्या समस्या शासनाच्या निदर्शनास आणून त्या सुद्धा सोडविण्याकरता प्रयत्न करणार असल्याचामनोदय सुद्धा त्यांनी व्यक्त केला आहे ते आपल्या निवडीचे श्रेय अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील ग्रंथालयाच्या कार्यकर्त्यांना व सेवकांना देत आहेत

### पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा ३० सप्टेंबरला

वाशिम, दि. २४ सप्टेंबर (जिमाका) ह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, तळमजला, रूम नं. ११, वाशिम येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्यात मुथुट फायनान्स, वाशिम या नामांकित कंपनीत भरती होणार असून रिलेशनशिप मॅनेजर या पदासाठी एकूण १० पदे उपलब्ध आहेत. या पदासाठी किमान १२ वी उत्तीर्ण ते पदवीधर शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी मोठ्या संख्येने या रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवीण खंडारे, सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांनी केले आहे.

